# डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९३६ /२०२५ दि. १०/०७/२०२५

## —: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

**ज्याअर्थी, डोंबिवली** वाहतूक उपविभागाचे हद्दीत दिनांक ११/०७/२०२५ रोजी दुपारी १४:०० वाजेपासुन मॉडेल कॉलेज, खंबाळपाडा या ठिकाणी मॉडेल कॉलेज तिसऱ्या आणि अंतिम टप्याचा भव्य उद्घाटन समारंभ कार्यक्रम असुन सदर कार्यक्रमाचे उद्घाटन सोहळया करीता मा. पी. एस. श्रीधरण पिल्लई, राज्यपाल गोवा राज्य, व श्री. रविंद्र चव्हाण, आमदार, डोंबिवली, श्री. राजेश मोरे, आमदार कल्याण ग्रामीण व इतर मान्यवर सहभागी होणार आहेत. सदर कार्यक्रमाकरिता मान्यवर व नागरिक उपस्थीत राहणार असल्याने मॉडेल कॉलेज खंबाळपाडा गाव ठाकुर्ली पुर्व या भागात वाहतुक कोंडी निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :—

**प्रवेश बंद—** न्यु कल्याण रोड कडुन मॉडेल कॉलेज, खंबाळपाडा रोड कडे जाणाऱ्या वाहनांना **साई दरबार कॉर्नर/कांचनगाव खंबाळपाडा गाव प्रवेशद्वार** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग—** सदरची सर्व वाहने भोईरवाडी रोड अथवा न्यु कल्याण रोडने मातोश्री हॉटेलजवळुन ९० फीट रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद—** ९० फीट रोड व खंबाळपाडा गाव येथुन मॉडेल कॉलेज खंबाळपाडा रोड कडे येणाऱ्या वाहनांना **श्रीमंत गोपाळ राघो पाटील चौक/मॉडेल कॉलेज** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग—** सदरची सर्व वाहने डावे वळण घेवुन शंकेश्वर रोडने भोईरवाडी रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसूचना **दि. ११/०७/२०२५ रोजी दुपारी १४:०० वा. ते रात्रौ २०:०० वा. पावेतो** अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/— सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण, विशेष शाखा, ठाणे
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

CamScanner

विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण

नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**प्रत** :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग, पोनि डोंबिवली, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर

CamScanner